| | |
|---|---|
| | **वरिष्ठ पोलीस निरीक्षक**<br>**अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड**<br>**कार्यालय :- मासुळकर कॉलनी, अजमेरा, पिंपरी, पुणे** |
| | **ईमेल – pinarco.pcpc-mh@gov.in** |
| जा.क्र. | अं.प.वि.प.गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड दि. |

# अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी

**अंमली पदार्थ विरोधी पथकाने आरोपी कडुन एकुण ४४ किलो ७९० ग्रॅम एम डी ४४,७९,८०,०००/- किमतीचा एम.डी. (मेफेड्रॉन) जप्त**

---

दि. ०१/०३/२०२४ रोजी नारायण पाटील, सहा.पोलीस निरीक्षक, सांगवी पोलीस स्टेशन हे रात्रगस्त दरम्यान घरफोडी,चोरीस प्रतिबंध करण्याचे अनुषंगाने पिंपळे निलख भागात पेट्रोलिंग करीत असताना रक्षक चौकाचे पुढील बाजुस डी.पी. रोड पिंपळे निलख येथे पहाटे ०४/३० वा चे सुमारास आले असता हातामध्ये पांढऱ्या रंगाची पिशवी असलेला एक इसम त्यांचेकडील सरकारी गाडी पाहुन घाईघाईने निघुन जावु लागला. सदर इसमाचा त्यांना संशय आलेने, त्यांनी सोबतचा स्टाफ पोहवा १५३५ मोरे व पो.कॉ. २८७३ कांबळे यांचे मदतीने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ताविचारला. त्याने त्याचे नाव नमामी शंकर झा, वय ३२ वर्षे, रा.संजय पाटील यांचे खोलीत, सेक्टरनं. २७, भेलचौक, निगडी पुणे मुळ गाव - मेहनात पैवती, ता. महीनाम, जि.दरभंगा, राज्य- बिहार असे सांगितले.त्याचे हातातील पिशवी बाबत विचारपुस केली असता तो उडवा उडवीची उत्तरेदेवु लागला, त्यानंतर त्याचेकडे अधिक चौकशी केली असता,त्याने सदर पिशवी मध्ये एम.डी. हा अंमली पदार्थ असलेचे सांगितलेने सपोनि नारायण पाटील यांनी तपास पथकातील स्टाफ व दोन पंच बोलावुन घेतले. सदर इसमाचे ताब्यातील पिशवीची झडती घेतली असता त्याचे ताब्यात २,०२,००,०००/- रु किंमतीचा ०२ किलो २० ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच १०,०००/- रु किं.चा मोबाईल फोन मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले असुन त्याबाबत सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ७५/२०२४, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २१(क), २२(क) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढील तपास चालु आहे. आरोपीतास आज रोजी मा. न्यायालयात हजर केले असता त्याची ०७ दिवस पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आले आहे.

त्यानंतर दाखल गुन्हयाचा तपास हा अंमली पदार्थ विरोधी पथकाकडे वर्ग झाल्यानंतर आरोपी नमामी शंकर झा, वय ३२ वर्षे, रा. मेहनात पैवती, ता. महीनाम, जि.दरभंगा, राज्य- बिहार याच्या कडे तपास करुन तपासात त्याचे कडुन निगडी येथुन ४२ किलो ७७० ग्रॅम एमडी. असा **एकुण ४४ किलो ७९० ग्रॅम एम डी ४४,७९,८०,०००/- किमतीचा** एम.डी. (मेफेड्रॉन) हा ड्रग्ज जप्त करण्यात आला आहे. सदरच्या गुन्हयात पोलीस उप निरीक्षक विकास शेळके यांचा सहभाग निष्पन्न होत असल्याने त्यास दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यास रिमांड करीता मा. न्यायालयात हजर करीत आहोत.

सदरची कामगिरी माननीय श्री विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त पिं.चिं. , श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त., श्री संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त गुन्हे पिं.चिं., श्रीमती स्वप्ना गोरे , पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ पिंपरी- चिंचवड., श्री शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त परिमंडळ -३ पिं.चिं., डॉ. श्री विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त, चिंचवड विभाग पिंपरी -चिंचवड., श्री. बाळासाहेब कोपनर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पिंपरी -चिंचवड यांचे मार्गदर्शना खाली श्री वैभव शिंगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ् विरोधी पथक गुन्हे शाखा पिं.चिं., स.पो.नि. प्रशांत महाले, स.पो.नि. सचिन कदम, व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे स्टाफ यांनी केली.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त परि-१
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड